639/1615

东京外国語大学
図書館蔵書
515846
平成 14 年度

635/1015

# EXPOSITION OF THE LORD'S PRAYER.

# येशू ख्रीस्ताने
# जी प्रार्थना आपल्या शिष्यांस सांगितली
# तिजवर टीका

देवाची प्रार्थना केली पाहिजे ह्या गोष्टीला नास्तिक मताच्या लोकांवांचून सर्व लोक मान्य आहेत. देव आहे असें जो मत धरितो त्याला ही गोष्ट बालबोध. फार सोपी ह्मणून वाटती. कां तर प्रार्थना ह्मणजे काय प्रार्थना ह्मणजे मागणें विनंती करणें. कोण्हाला कोण्हा एके वस्तूची गरज लागली असली. तर ज्यापासीं ती वस्तू आहे त्याच्या जवळ जाऊन त्या वस्तूविषयीं त्याची विनंती तो करितो ह्मणजे त्या वस्तूविषयीं त्याची प्रार्थना करितो. ही आपलीच गोष्ट आहे सर्व मनुष्य जाति ह्मणजे अवघे लोक गरजवंत आहेत. मनुष्य जातीचा स्वतः उ-

*No. 31 Bombay Tract and Book Society. 2d Edit:*
*Copies (2000)*

त्पन्न झालेला असा कोण्ही नाहीं· आपल्या आपण जन्मास आलेला असा कोण्ही नाहीं देव जन्मास घालितो तरच कोण्ही जन्मास येतो· आपल्या स्वाधीन असा मनुष्य जातीचा कोण्ही नाहीं· जन्मापासून सर्व लोक देवाचे आश्रित असतात· देवाला आश्रयून आणि अवलंबून सर्व लोक चालतात आणि वागतात· जें कांहीं कोण्हाजवळ आहे तें देवाने त्याला दिल्हें आहे· जन्मास घालणारा देव आहे बुद्धि देणारा देव आहे आंगांत शक्ति देणारा देव आहे पोटाला मिळवायाला सामर्थ्य देणारा देव आहे· दिवसान दिवस संभाळणारा आणि पोसणारा आणि संरक्षण करणारा देव आहे· असें आहे तर देवाची प्रार्थना सर्वांनी करावी ही गोष्ट उघडीच आहे· सर्वांनी त्याची प्रार्थना करावी ही देवाची आज्ञा आहे·

आपणास ज्या गोष्टी पाहिजेत त्या देवास कळत नाहींत ह्मणून आपण त्याला कळवून त्याची प्रार्थना करावी असें नाहीं· ज्या ज्या गोष्टी आपणास पाहिजेत त्या त्या देवास माहीत आहेत· आपण प्रार्थना केल्याच्या पूर्वीं देव समजतो तरीं आपण त्याची

0/50,534
G1049



प्रार्थना करावी ह्मणून तो आज्ञा करितो कां जर ह्मणाल तर ह्यासाठीं किं आपण त्याजवर आश्रयून वागतों त्याच्या आश्रयानें मात्र चालतों बोलतों उद्योग करितों हें आमच्या ध्यानांत मनांत राहावें ह्मणूनच·

आपण देवाची प्रार्थना अगदीं केल्यावांचून जर देव आपणास नित्य चांगल्या वस्तू देता तर आपण त्याजवर आश्रयून आहों ह्या गोष्टींचा विसर पडता परंतु आपण नित्य देवाची प्रार्थना करितों तर आपण त्याजवर आश्रयून आहों ही जी आमची अवस्था ही आमच्या मनांत राहते· आणखी एक कारण सांगतों आपल्या विनंती वरून आपणास कोण्हा एकानें जर कांहीं दिल्हें तर त्याजवर आपली प्रीति वाटती तसें ज्या वस्तूंचा भोग आपण करितों त्या वस्तू आमच्या प्रार्थने वरून देवाने दिल्ह्या असी आठवण करून आपण त्याजवर प्रीति अधिक ठेवावी ह्मणूनच माझी प्रार्थना करा देव ह्मणतो·

देवाची प्रार्थना केली पाहिजे ह्या गोष्टीला लोक मान्य आहेत खरें तरीं प्रार्थना कसी करावी आणि कोणत्या गोष्टींविषयीं प्रार्थना करावी हें बहूत

करून लोकांस समजत नाहीं ह्या विषयीं लोकांचें अ-
ज्ञान फार मोठेंच आहे· ह्या गोष्टीला सद्गुरु असावा त
र एकच जो सद्गुरु ह्मणजे देवाचा पुत्र येशूख्रीस्त आ
हे· ह्या गोष्टी विषयीं ह्याने उपदेश केला आहे· मा-
त्थीने लिहिलेलें सुवर्तमान ह्याच्या साहाव्या अध्या-
यांत पांचव्या ओवींत असें सांगितलें आहे·

“जेव्हां प्रार्थना करशील तेव्हां ढोंग्यासारिखा
“होऊं नको कां किं ढोंग्यांस लोकांच्या दृष्टीस पडावें ह्म-
“णून सभांमध्यें किंवा मार्गाच्या कोनामध्यें उभें राहून
“प्रार्थना करावयास आवडतें· तुह्मांस निश्चयें सांग-
“तों ते आपलें फळ पावतात· तर तूं जेव्हां प्रार्थना
“करसील तेव्हां आपल्या एकांतीं जाऊन दार लाऊ-
“न आपला बाप जो गुप्त आहे त्याची प्रार्थना कर
“ह्मणजे तुझा बाप जो गुप्त पाहातो तो तुला लौकिकां-
“त फळ देईल· तेव्हां प्रार्थना करितांना परप्रजां सा-
“रिखें पुनः पुनरपि बोलून बडबड करूं नको· आम-
“च्या फार बोलण्याने आमचें कार्य होईल असें त्यां-
“स वाटतें तर त्यांच्या सारिखें होऊं नका कारण किं
“तुह्मी आपल्या बापा जवळ मागण्याच्या पूर्वीं ज्या



“गोष्टी तुह्मास पाहिजेत त्या त्यास कळल्या ह्मणून
“ह्या प्रकारें प्रार्थना करा हे आकाशांत राहाणाऱ्या आ-
“मच्या बापा तुझें नाम पवित्र मानिलें होवो· तुझें राज्य
“येवो· जसी आकाशांत तुझी इच्छा चालती तसी पृ-
“थ्वींतहि चालो· आमची नित्याची भाकर आज आ-
“ह्मास दे· आणि जसें आह्मी आपल्या ऋण्यांस सो-
“डितों तसें तूं आमचीं ऋणें आह्मास सोड· आह्मास
“परीक्षेंत नेऊं नको परंतु दुष्टापासून तार कांकिं रा-
“ज्य सामर्थ्य आणि प्रताप हीं सर्वकाळ तुझीच आ-
“हेत तथास्तु·

कां तर दुसऱ्यांचे अपराध जर तुह्मी सोडितां तर
तुमचा आकाशांतील बाप तुमचे अपराध सोडील प-
रंतु जर तुह्मी दुसऱ्यांचे अपराध सोडीत नाहीं तर तु-
मचा बाप तुमचे अपराध सोडणार नाहीं· ह्या गोष्टी ये-
शूख्रीस्ताने आपल्या शिष्यांस सांगितल्या असा चांग-
ला उपदेश त्याने त्यांस केला· त्याच्या बोलण्यांत अर्थ
फार आहे प्रार्थना कसी करावी आणि कोणत्या गो-
ष्टीं विषयीं प्रार्थना करावी हीं दोन्हीं प्रकरणें त्याच्या
बोलण्यांत आलीं· त्याच्या बोलण्याचा उलगडा मी

आपल्या बुद्धीप्रमाणें करितें तर अहो मित्रानो माझ्या
गोष्टींकडे लक्ष्य लावा चित्त एकाग्र करून माझ्या गो
ष्टींचा अर्थ समजून घ्या·

मोठ्या माणसाची भेट घ्यायाची असली तर का
य बोलावें काय न बोलावें कसें काय करावें ह्यांविषयीं-
सांगणारा मिळाल्यास तुम्ही लक्ष्य कसें लावितां तरही
गोष्ट त्यापेक्षां मोठी· ही मोठ्या माणसाच्या भेटीची गो
ष्ट नाहीं ही देवाविषयींची गोष्ट आहे· मोठा देव जो आ
ह्या सर्वांचा पोसणारा आणि संभाळणारा आहे ज्याच्या
आश्रयाने आपण सर्व चालतों त्याची प्रार्थना कसी क-
रावी ही गोष्ट आहे मग मन किती लाविलें पाहिजे हो·

प्रार्थना कसी करावी हें प्रकरण पहिलें सांगतो·
लोकांमध्यें कीर्ति मिळवावी लोकानी धार्मिक भक्त सा
धु असें समजावें ह्या मनाने जो लोकांच्या देखतां दे-
वाची प्रार्थना करितो तो वाईट रीतीने करितो· असल्या
रीतीने केलेली प्रार्थना देवाजवळ सादर होत नाहीं· अ-
सल्या रीतीने जे लोक प्रार्थना करितात ते ढोंगी आहे-
त· असल्या रीतीने प्रार्थना करणाऱ्यांस पापाचें ओझें
समजत नाहीं· पापाचा दुष्टपणा त्यांस दिसला नाहीं· पापा



पासून मोकळे होण्याविषयीं त्यांस काळजी नाहीं· पापा
मुळें जो दंड देव देणार आहे ह्याचें भय त्यांस नाहीं· दे
वाची प्रीति किंवा देवाची भीड त्यांस नाहीं· देवाने त्यां-
ची प्रार्थना ऐकावी असी इच्छा त्यांस नाहीं· देव ऐको
किं न ऐको त्यांस सारिखेंच आहे· असल्या लोकांची क
ल्पना फार दुष्ट आहे खरें·

त्या सर्वांचें काम एक आहे म्हणजे जेथें लोक पाह
तील अशा ठिकाण्यांत जाऊन देवाची प्रार्थना करणें
परंतु सर्वांचें मन एक नाहीं बहुतांच्या मनांत लोभ आ
हे· लोक पाहून आणि धार्मिक समजून कांहीं देतील
ह्या आशेने लोकांच्या दृष्टीस देवाचें भजन करितात आ
णि भक्तीचीं चिन्हें आपल्या आंगावर घेतात· बहुतां
च्या मनांत गर्व आहे· सर्वांनी मोठे साधू समजावें आ
णि असें समजून फार मान करावा आणि पायां पडा
वें हें त्यांस फार आवडतें ह्यासाठीं जेथें लोक पाहती
ल अशा ठिकाण्यांत जाऊन देवाची भक्ति करितात
अशा ढोंग्यां सारिखे होऊं नका म्हणून येशू ख्रीस्त आ
पल्या शिष्यांस म्हणतो· ते आपलें फळ पावून आहे-
त असें त्यांजविषयीं येशू बोलतो· पहिल्यांचें फळ

ह्मणजे लोकांकडून पैका खाणें पिणें वस्त्र प्रावरण हीं
त्यांस मिळतात· दुसऱ्यांचें फळ ह्मणजे लोकांमध्यें की
र्ति लोकांकडून मान आणि सत्कार हे त्यांस मिळतात प
रंतु देवा कडून त्यांस कांहीं मिळत नाहीं· देवाजवळ त्यां
ची प्रार्थना सादरच होत नाहीं· देवानें कांहीं द्यावें देवा
ने आमची प्रार्थना ऐकावी इतकेंच देखील त्यांच्या म-
नांत नव्हतें तर देवाकडून त्यांस कांहीं वस्तू कसें मिळे
ल· लोकांनी पाहून पैका दिल्हा किंवा लोकानी पाहून
आणि मोठे समजून सन्मान केला तर त्यांस पुरे तित
क्यांची आशा धरली होती· अहो अशा लोकांचें पापके
वढें तें देवाचा अनादर आणि अपमान किति करिता
त हो· लोकांच्या समजण्यांत ते देवाची भक्ति करितात
परंतु देवाकडे त्यांचें लक्ष्य नाहीं देवाची प्रीति त्यांच्या
पोटांत नाहीं ढोंगानें मात्र प्रार्थना करितात ह्मणून देवा
च्या समजण्यांत ते पाप करितात· राजापाशीं जाऊन
त्याची प्रार्थना कोण्ही ढोंगाने करितो हे राजा अमकें
मला दे तमकें मला दे असी त्याची विनंती करितो·
हा माणूस ढोंगानें मात्र माझी प्रार्थना करितो हें जर
राजास समजलें तर राजा काय करील बरें त्या माणसा



वर प्रसन्न होईल काय· त्याला धरून मारून टाकील हें
च करील· राजा अंतर साक्षी नसतो ह्मणून त्याची प्रा
र्थना जे करितात ते ढोंगानें करितात किं मनापासू
न करितात हें बहूत करून राजास समजत नाहीं प
रंतु देव अंतर साक्षी आहे त्यापासून कांहीं लपवत
नाहीं जितक्या कल्पना कोण्हाच्या मनांत उठतात त्या
सर्व तो जाणतो तर हे ढोंगी त्याचा अनादर करितात
हें त्यास ठाऊक नाहीं काय त्यास ठाऊक आहे हो आ-
णि त्या ढोंग्याचा दंड तो करीलच करील· त्यांचा अना-
दर जरीं आतां सोसून घेतो तरीं शेवटल्या दिवसीं
जगाचा न्याय करील तेव्हां त्यांपासून पुसून घेईल·

हें पाप ह्मणजे ढोंगानें प्रार्थना करणें ह्या देशांत
फार माजलें आहे लोकांपासून पैका घ्याया करितां लो
भानें भक्तीचें ढोंग करणारे मोजवत नाहींत इतके
आहेत· आणि लोकांमध्यें कीर्ति मिळवाया करितां
लोकानी साधु समजून पायां पडावें आणि मोठा मा
न करावा ह्या बुद्धीनें भक्ति करणारे हेहि कोण्हाच्या
नें मोजवत नाहींत ते देव्हारा किती माजवितात
धर्म चिन्हें किती लावितात परंतु ढोंगानें मात्र देवा

ची प्रीति पोटांत नाहींच·

खोटी प्रार्थना करणाऱ्यांचें दुसरें एक लक्षण ये
शू ख्रीस्ताने सांगितलें ह्मणजे प्रार्थना करते वेळेस
उगीच फार बोलून पोकळ गोष्टी करून जें एकदां ह्म
टलें तेंच पुनः पुनरपि ह्मणावें आणि असी प्रार्थना
लांबवावी· असें करणारे त्या देशांत बहूत आहेत
हातीं माळ घेऊन बसतां उठतां चालतां व्यापार क
रितां लोकांसीं बोलतां जप करितात· जें एकदां ह्मटलें
तें पुनः ह्मणतात कोण्ही दाहादां कोण्ही वीसदां कोण्ही
तीसदां फावल्यास कोण्ही शंभरदां ह्मणतात आणि शं
भरपट पुण्य मिळविलें असें समजतात परंतु हें का
य हो ही पोपटाची प्रार्थना ही पोपटाची भक्ति पोपटा
ला कोण्ही शिकविलें तर असी प्रार्थना असी भक्ति
पोपट करील· अशा प्रार्थनेचा पोकळपणा लोकास
सहज समजत नाही हें मोठें आश्चर्य लेंकरास बापा
पासून कांहीं मागायाचें आहे तर तो बापाची प्रार्थना
कसी करील हे बापा हे बापा हे बापा असें ह्मणत अ-
सल काय असें ह्मणत बसला तर बापास राग न येई-
ल काय माझी थट्टा करितोस काय माझी प्रार्थना करा



याची आहे तर माझी भीड धरून मन मोकळें करून
माझी प्रार्थना कर असें लेंकरास नह्मणेल काय· को-
ण्हा एकाने कांहीं वाईट काम करून फांसीं जाणार
आहे त्याजवळून राजा गेला तर राजापासीं आपल्या
जिवाचें दान मागेलच परंतु कसें मागेल हो हे राजा
हे राजा हे राजा इतकेंच बोलेल काय तर नाहीं परं
तु आपल्यां अपराधास कबूल होऊन क्षमा मागील
राजास कळ कळ वाटे अशा गोष्टी बोलेल हे महारा
ज मी अपराधी मी मोठा अपराधी आहें खरें तरीं मज
वर दया कर तूं कृपाळू आहेस तूं दयाळू आहेस तूं
करुणासागर आहेस मी तुझ्या पायां पडतों हे राजा
माझी क्षमा करून माझ्या जिवाचें दान मला कर अ
सें बोलेल· बरें तर बापापासीं लेंकरूं करावयाचें नाहीं
राजापासीं अपराधी आपल्या जिवाचें दान मागतांना
करावयाचा नाहीं तें आपण देवापासीं करावें काय
अहो ही कसी गोष्ट आहे असें जे करितात ते मोठें पा
प करितात खरें· हें मोठें पाप अवघे ढोंगी करीत अ
सतात परंतु त्यां सारिखें तुह्मी करूं नका असें ये शू
ख्रीस्त आपल्या शिष्यांस बोलतो·

तर प्रार्थना कसी करावी हा प्रश्न जर केला तर
ह्याचें उत्तर सहजच मिळेल· येशूने ज्या गोष्टी आपल्या
शिष्यांस सांगितल्या त्यांत ह्याचें उत्तर आलें आहे·
एकांतीं जेथें लोकांच्याने पाहावत नाहीं अशा ठिका
ण्यांत जाऊन देवाची प्रार्थना केली पाहिजे· एकटा ए
कला असून जी प्रार्थना करावी त्या प्रार्थने विषयीं ही
गोष्ट सांगीतलेली आहे भक्तांच्या मंडळी बरोबर जी प्रा
र्थना करावी त्या प्रार्थनेस ही गोष्ट लागत नाहीं·

एकट्या एकल्याने जी प्रार्थना करावी ती एकां
तीं व्हावी ह्याचीं कारणें अनेक आहेत· लोकानी पाहि
ल्यामुळें आणि साधू भक्त धार्मिक असा समजल्या-
मुळें जो गर्व उत्पन्न होतो तो उत्पन्न न व्हावा ह्मणून
एकांतीं प्रार्थना करावी हें एक कारण· आपण प्रार्थना
करते वेळेस लोक जवळ आहेत तर आपली बुद्धि फां
कती आपलें मन व्यग्र होतें ह्मणून एकांतीं जाऊन
प्रार्थना करावी असें दुसरें कारण आहे· आपण प्रार्थ
ना करते वेळेस लोक जवळ आहेत तर आपणास द
डपण आहे असें आपल्या जिवास वाटतें मग जें बो
लायाचें आहे तें बोलवत नाहीं· आपण देवाची प्रार्थ-



ना करितों तेव्हां आपलें मन मोकळें करावें आपल्या
मनांत ज्या दुष्ट कल्पना उठल्या त्या सांगाव्या आपल्या
तोंडांतून जे दुष्ट शब्द निघाले ते सांगावे आपल्या
हातानें जीं वाईट कामें घडलीं तीं सांगावीं हीं सगळीं
आपल्या पदरीं घेऊन क्षमा मागावी आणि आपणा
स ज्या कांहींचें भय वाटतें तें सांगून त्याचें वारण मा
गावें आणि देवाने जे उपकार केले त्यांजकरितां देवा-
चें स्तवन करावें असी इच्छा आपणास असती परंतु
लोक जवळ आहेत तर हें होत नाहीं· लोकांच्या काना-
वर घालायाजोग्या नाहींत तरी प्रार्थना करितांना कृ
पाळू दयाळू देवाच्या कानांवर घालायाजोग्या आहेत
अशा कित्येक गोष्टी आहेत ह्या गोष्टी एकांतीं गेल्या-
वांचून सांगवत नाहींत· एकांतीं प्रार्थना करण्याचीं
कारणें असीं मोठीं आहेत·

एकट्या एकल्याने जी प्रार्थना करावी ती एकांतीं
करावी ही देवाची आज्ञा खरें तरीं एकांतीं जावत ना-
हीं असा प्रसंग जर पडला तर लोक जवळ आहेत
ह्याची चिंता धरूं नये· लोकांची भीड टाकून देवाची प्रा-
र्थना केली पाहिजे लोकांच्या भयाने देवाची प्रार्थना सो

डाची हें फार वाईट होय·

प्रार्थना कसी करावी ह्याविषयीं सांगायाजोग्या बहूत गोष्टी आहेत परंतु ग्रंथाचा विस्तार न व्हावा ह्मणून सांगीत नाहीं ज्या गोष्टी संक्षेपें करून सांगितल्याआहेत त्यांचा चांगला विचार करावा· आतां कोणत्या गोष्टींविषयीं प्रार्थना करावी हें प्रकरण सांगतों·

कोणत्या व कशा गोष्टी देवापासीं प्रार्थना करून मागाव्या हें आमचा प्रभु आणि तारणारा येशूख्रीस्त ह्याने स्पष्ट दाखविलें आहे· तो आपल्या शिष्यांसबोलला कीं ह्याप्रकारें तुह्मी प्रार्थना करा·

हे आमच्या बापा आकाशांत राहाण्या तुझें नाम पवित्र मानिलें होवो· तुझें राज्य येवो· जसी आकाशांत तुझी इच्छा चालती तसी पृथ्वींतहि चालो· आमची नित्याची भाकर आज आह्मास दे· आणि जसें आह्मी आपल्या ऋण्यांस सोडितों तसें तूं आमचीं ऋणें आह्मास सोड· आणि आह्मास परीक्षेंत नेऊं नको परंतु दुष्टापासून तार कां कि राज्य सामर्थ्य आणि प्रताप हीं सर्वकाळ तुझींच आहेत तथास्तु·

ही जी प्रार्थना येशूने आपल्या शिष्यांस शिक-



विली लाहान आहे खरें तरीं अर्थ किती आहे· अहो मित्रांनो माझ्या बोलण्याकडे लक्ष लावा माझ्या गोष्टींलाचित्त द्या· जी प्रार्थना येशूख्रीस्ताने आपल्या शिष्यांस शिकविली तिचा उलगडा करितों प्रत्येक वाक्याचा अर्थ अनुक्रमाने सांगतों·

## हे आकाशांत राहाणाऱ्या आमच्या बापा·

कोण्हा एकाची विनंती करावयाची आहे तर प्रथमीं त्याचा महिमा व[illegible]वा आणि त्याचा व आपला संबंध जो आहे ज्या संबंधावरून आपण त्याची विनंती करितों तो सांगावा हें योग्य आहे· तर आपल्या प्रार्थनेच्या प्रारंभीं देवाचा महिमा वर्णावा आणि देवाचा व आपला जो संबंध आहे तो सांगावा असें येशूने शिकवलें हे आमच्या बापा ह्या शब्दांवरून देवाचा व आपला संबंध समजतो· आकाशांत राहाणाऱ्या ह्या शब्दांवरून देवाचा महिमा समजतो· देव आत्मा आहे देव मूर्तिमान् नाहीं देव आत्मरूपें सर्वत्र सर्व ठिकाण्यांत आहे देव आत्मरूप आहे ह्मणून कोण्हाच्या दृष्टीस पडत नाहीं तरी तो कोण्हांपासून लांब नाहीं· तो सर्वांस पाहतो सर्वांचे शब्द

ऐकतो सर्वांच्या मनांतील कल्पना जाणतो सर्वांच्याकामाचें अवलोकन करितो· त्याला आंधार आणि उजेड रात्र आणि दिवस सारखींच आहेत· आकाश त्याचें बसायाचें आसन आहे आणि पृथ्वी ही त्याच्या पायांचें आसन असें आलंकार रूप वर्णन आहे· देवाचें तेज व प्रताप त्याच्या कामांवरून दिसतात· सूर्य चंद्र तारे समुद्र झाडें फुलें हीं सगळीं देवाचे गुण दाखवितात परंतु एक स्थान आहे ज्या स्थानीं देवाचे सर्व गुण विशेषेंकरून प्रगट आहेत तें स्थान देवाच्या पोथीमध्यें आकाश ह्मणून ह्मटलेलें आहे· ह्या स्थानी देवाचे असंख्यात दूत पवित्र ज्ञानशाली बलशाली तेजोशाली असे दूत राहतात·

देव सर्वांचा उत्पन्न करणारा आहे जितकीं माणसें जन्मतात तितक्यांस तोच जन्मास घालणारा आहे ह्मणून देव सर्वांचा बाप आहे परंतु मनुष्यजाति पापाने भ्रष्ट झाली ह्मणून सर्व माणसें जन्मापासून देवाच्या घरचीं बाटलेलीं असतात सर्व माणसें जन्मापासून जातिस्वभाव परत्वें करून पाप करितात देवाला विसरतात देवाला पाठीमागें टाकितात देवाच्या आज्ञा मो-



डून देवाचा अपमान करितात तर बापापासून फितलेलीं लेंकरें असीं सर्व माणसें स्वभावाने आहेत· असीं असतांना देव बाप आहे ह्या संबंधावरून देवाची प्रार्थना त्यांच्यानी करवत नाहीं· हीं माझीं लेंकरें आहेत असा त्यांचा अंगीकार देव करीत नाहीं· दुष्ट आत्मा जो सैतान त्याचीं लेंकरें तीं आहेत असें त्यांजविषयीं देवानें ह्मटलें आहे· तर देवाला बाप कोण्ही ह्मणावें· हा प्रश्न जर करितां तर ह्याचें उत्तर मी करितों· ज्यांस पापाचा पश्चात्ताप झाला आहे ज्यांचें मन पवित्र आत्म्याच्या योगाने पालटलें आहे जे पापापासून फिरून पापाला रडून एकला जो तारणारा ह्मणजे येशू ख्रीस्त ह्याला शरण आले आहेत त्यानीच देवाला बाप ह्मणावें· तीं पहिलें दुष्ट आत्म्याचीं लेंकरें होतीं खरें परंतु पापापासून फिरून येशूवर भाव ठेवितांच त्यांचा दुसरा जन्म झाला· जितकीं माणसें येशू ख्रीस्तावर भाव ठेवितात तितक्यांस देवाला बाप ह्मणायाचा अधिकार असतोच· हीं माझीं लेंकरें आहेत असा त्यांचा अंगीकार देव करितोच· बापा सारिखा देव त्यांजवर दया करितो बापा सारिखा देव त्यांस संभाळितो आणि

पोसितो· पश्चिमेपासून पूर्व जितकी लांब तितकीं लांब त्यांचीं पापें देव दूर करितो· तान्ह्या मुलाचा विसर आयीला पडावा ही गोष्ट कठीण आहे तरीं एखाद्या वेळेस ही कठीण गोष्ट घडती· आयीला देखील तान्ह्या मुलाचा विसर पडतोच· परंतु पापाला रडून येशू ख्रीस्ताला शरण आलीं आणि असा दुसरा जन्म पावून देवाचीं लेंकरें झालीं असीं जीं माणसें त्यांचा विसर देवास कधीं पडायाचा नाहीं गव्याच्या तायीला सारिखे त्यांस वागवितो आणि पाळितो·

पापाचा पश्चात्ताप पावून येशू ख्रीस्तावर भाव ठेवून देवाचीं लेंकरें झालीं जीं माणसें त्यांस केवढी मोठी पदवी मिळाली हो· तीं माणसें धन्य खरें· त्यांचें कल्याण झालें खरें· संपत्ति जरीं नाहीं उत्तम वस्त्र जरीं नाहीं उत्तम भोजन जरीं नाहीं तरीं त्यांचें परम सुख आहे· देव आमचा बाप आहे आमचा फार कृपाळू दयाळू बाप आहे आह्मी त्याचीं लेंकरें आहों आयुष्यापर्यंत आह्मी त्याची सेवा ह्या लोकीं करूं जीं कामें त्यानें सांगितलीं तीं करूं मग मरणानंतर आह्मी त्यापासीं जाऊं आणि पवित्र निरंतर सुख भोगूं असा



विचार करून काय आनंद पावतात हो·

## तुझें नाम पवित्र मानिलें होवो·

जो सुपुत्र आहे तो आपल्या बापाच्या नावाचा अभिमान बाळगितो बापाच्या अबरूविषयीं चिंता धरितो बापाच्या नावाला कोण्ही बट्टा लाविला बापाचें नाव कोण्ही तुच्छ मानिलें बापाचें नाव कोण्ही हलक्यामनाने घेतलें तर त्याला फार दुःख वाटतो· सर्वानी त्याच्या बापाचा मान करावा त्याच्या बापाच्या नावाची भीड धरावी असी त्याची इच्छा असती· लोकांमध्यें बापाची प्रतिष्ठा आहे तर आनंद करितो बापाची अप्रतिष्ठा आहे तर खिन्न होतो· असेंच जीं माणसें येशू ख्रीस्तावर भाव ठेवून देवाचीं लेंकरें झालीं त्यांस त्यांच्या बापाच्या नामाची मोठी प्रीति असती· देवाचें नाम त्यांस फार प्रिय असतें त्याचा अभिमान फार बाळगितात· देवाचा मान सर्वानी करावा देवाच्या नामाची भीड सर्वानी धरावी देवाचें भय सर्वानी बाळगावें असी त्याची मोठी इच्छा असती· देवाच्या नामाचा मोठेपणा जिवापेक्षां त्यांस प्रिय असतो ह्मणून तुझें नाम पवित्र

मानिलें होवो ही विनंती पहिलें करावी असें येशू ख्री स्ताने शिकवलें·

देवाचें नाम पवित्र मानितात असीं थोडकींच माणसें आहेत· देवाच्या नामाची अवहेळणा करितात असीं बहूत माणसें आहेत· जीं माणसें पोपटासारिखें देवाचें नाम बहुदां घेऊन प्रार्थना केली असें समजतात तीं देवाच्या नामाचा अपमान करितात· जीं माणसें देवाच्या नामाने खोटी शपथ वाहतात तीं देवाच्या नामाचा अपमान करितात· कांहीं आश्चर्य वाटलें असतां अरे देवा अरे भगवान असे शब्द देवाकडे लक्ष्य न लावितां देवाच्या नामाची भीड न धरितां हलक्या मनाने बोलतात असीं जीं माणसें तीं देवाच्या नामाचा अपमान करितात· देवाच्या नामाचा अपमान करणें हें मोठें पाप आहे· आपल्या नामाच्या मोठेपणाची चिंता देव इतकी बाळगितो किंज्या दाहा आज्ञा त्याने दिल्या त्यांतील तिसरी आज्ञा असी सांगितली·



## देवाचें नाम उगीच ह्मणजे कारणावांचून किंवा हलक्या मनाने घेऊ नको

लोकांच्या दृष्टीस हें पाप लाहान परंतु देवाच्या दृष्टीस हें पाप फारच फारच मोठें आहे· प्रजेचा माल चोरी करून घेणें हें राजाच्या दृष्टीस वायीट काम आहे खरें परंतु राजाचा अपमान करणें त्याच्या आज्ञांची अवहेळणा करणें किंवा बंड करणें त्या चोरीपेक्षां वायीट वाटतें· हें वाजवीच त्यापेक्षां वायीट आहेच खरें कांकिं प्रजेच्या मालाची चोरी करितो जो तो एकाचा अपकार करितो परंतु राजावर उठतो जो तो सगळ्या देशाचा अनर्थ करितो· असें देवाच्या नावाचा अपमान करणें हें मोठें मोठें पाप समजावें·

## तुझें राज्य येवो

देव राजा आहे देव राजाधिराज आहे तो सर्व सृष्टीचा राजा आहे· सर्व जीवजंतू त्याच्या प्रजा आहेत· त्याची सेवा करावयास त्याने सर्वांस उत्पन्न केलें· देवाचें राज्य सर्वांवर आहेच तर तुझें राज्य येवो हें कां मागावें हा प्रश्न तुह्मी कराल तर मी सांगतों ऐका·

देवाचें राज्य सर्वांवर आहे हें खरें सर्व सृष्टि त्याच्या स्वा
धीन आणि त्याच्या हाता खालीं आहे· तो आपल्या इ
च्छेप्रमाणें चालतो त्याची बुद्धि त्यास सांगती तसें तो
करितो त्याला प्रतिबंध कोण्हाच्याने करवत नाहीं ह्म-
णून हा अर्थ घेऊन तुझें राज्य येवो हें मागूं नये ह्या अ
र्थांत देवाचें राज्य पहिल्या पासून आलेंच आहे· ज्यारा
ज्याच्या येण्या विषयीं प्रार्थना करावयास येशूने शिक
वलें हें राज्य न्यारें आहे हें अंतःकरणावरचें राज्य म
नावरचें राज्य आहे· हें राज्य प्रीतिचें राज्य होय हें रा-
ज्य ह्मणजे खरेपणा शांति आणि पवित्र आत्म्याच्या
योगें करून आनंद असें आहे· ज्याचें मन पवित्र आ
त्म्याने पालटलें आहे ज्यास पापाचा खरा पश्चात्ताप झा
ला ज्याच्या मनांत देवावर प्रीति उत्पन्न झाली ज्यास
देवाच्या आज्ञा सर्व प्रिय वाटतात देवाच्या सर्व आ-
ज्ञा मानाव्या असें ज्याचें मन असतें त्यावर हें राज्य आ
लें आहे· ह्या अर्थांत देवाचें राज्य जें सर्वांवर यावें तें अ
जून सर्वांवर आलें नाहींच· मनुष्य जाति देवापासून फि
तली आहे· देवाचें भय टाकून देवाची भीड टाकून मा
णसें मनस्वी चालतात देवाच्या आज्ञा तुच्छ करून



त्यांच्या मनास येईल तसें करितात· असें मनुष्य जाती
ने देवाचें राज्य टाकिलें· फितलेली मनुष्यजाति देवा
च्या राज्याखाली फिरून आणावया करितां देवाचा पु
त्र येशू ख्रीस्त अवतरला मनुष्याचा देह धरून मनु
ष्याचा जन्म घेऊन मनुष्यांमध्यें राहून त्याने आपला
जीव देऊन मनुष्य जातीच्या पापांचें प्रायश्चित्त के
लें· ह्या प्रायश्चित्ता करून देवाच्या न्यायास ठपका
आल्यावांचून देवाने मनुष्य जातीवर दया करावी अ
सी वाट त्याने पाडली·

देव जो बाप त्याने आपल्या पुत्राच्या हातीं रा-
ज्य दिल्हें आहे येशू ख्रीस्त देवाचा पुत्र तो राजा तो प
रम कृपावान् प्रीतिमान् बुद्धिमान् पराक्रमवान् राजा
आहे त्याचें राज्य धर्मराज्य त्याच्या प्रजा ह्मणजे त्याचे
भक्त त्याच्या राज्याखालीं फार सुख भोगितात· सर्व
लोकांचें कल्याण ते इच्छितात ह्मणून हें सुख सर्वां
नी भोगावें सर्वांनी अशा चांगल्या राज्या खाली यावें
ह्यासाठीं तुझें राज्य येवो असी प्रार्थना करावयास ये
शूनें शिकवलें· तुझें राज्य सर्व लोकांवर उगवतीपासू
न मावळतीपर्यंत पृथ्वीवर अहद तहद येईल असें

वचन देवाने आपल्या पुत्राला केलें आहे· येशू ख्री-
स्ताच्या प्रजा त्याजवर मोठी प्रीति ठेवितात तर हें व
चन पूर्ण व्हावें ह्मणून तुझें राज्य येवो असी प्रार्थना
त्यानी करावीच· देवाचें वचन कांहीं चुकायाचें नाहीं
तें निश्चयें पूर्ण होईल येशू ख्रीस्ताचें राज्य सर्व पृथ्वी
च्या लोकांवर येईल ही गोष्ट तर निस्संशय आहे ह्मणू
न त्याच्या भक्तानी आनंद करावा· येशू ख्रीस्ताचें रा-
ज्य सर्व पृथ्वीवर आलें ह्मणजे सर्व लोकांचें कल्या
ण होईल सर्व लोकांस शांति व समाधान होईल·

येशू मोठा पराक्रमवान् राजा आहे तर जो को
ण्ही पापाला रडून पापाला सोडून त्याला शरण येतो
आणि त्याची प्रजा होतो त्याला पोसावयास व पाळाव
यास राखावयास येशू समर्थ आहे· आणि जो कोण्ही
पाप सोडीत नाहीं त्याला शरण येत नाहीं त्याची प्रजा
होत नाहीं त्यास दंड करावयास येशू समर्थ आहे·

## जसी आकाशांत तुझी इच्छा चालती तसी पृथ्वींत हि चालो

जो राजा आहे त्याची इच्छा चालली पाहिजे त्या
ची इच्छा चालत नाहीं असें झालें तर तो राजा नाहीं·



देव राजाधिराज असतांनां सृष्टीचा धनी असतांनां
परात्पर स्वामी असतांनां त्याची इच्छा अवश्य करू
न चालली पाहिजे· त्याच्या आज्ञाप्रमाणें चालावें हें त्या-
च्या सर्व प्रजांचा धर्म आहे· देव आमचा उत्पन्न करणारा
आह्मी त्याची सेवा आणि भक्ति करावी ह्मणून त्याने
आह्मास उत्पन्न केलें· देव आमचा राजा आह्मी सर्व
त्याच्या प्रज्या आणि तो कसा राजा हो ह्मणजे फार कृ
पाळू दयाळू ज्ञानी न्यायी पवित्र पराक्रमी सत्यशील
असा राजा आहे तर आह्मी त्याची इच्छा चालवावी
आह्मी त्याच्या इच्छे प्रमाणें वागावें हें आह्मास अव
श्य करून लागतें ह्या गोष्टीला आह्मी बांधलेले आहों
ह्यांत संशय नाहीं·

देव पवित्र ज्ञानी न्यायी दयाळू असतांनां त्या
ची इच्छा नित्य सर्वकाळ उत्तम ह्मणजे पवित्र ज्ञानाची
आणि न्यायाप्रमाणें असती ही गोष्ट उघडीच आहे
कांकिं देव परम पवित्र मनाचा असतांनां त्याच्याने वा
ईट इच्छा करवत नाहीं· देवाची इच्छा प्रजांस कल्याण
कारक आहे तर त्याच्या सर्व प्रजानी त्याची इच्छा चाल
वावी आणि त्याच्या इच्छेप्रमाणें वागावें हें सहजच

दिसतें·

जसी आकाशांत देवाची इच्छा चालती तसी पृथ्वींतहि चालावी ही प्रार्थना करावयास येशूनें शिकविलें तर आकाशांत देवाची इच्छा कसी चालती आणि पृथ्वींत कसी चालती ही गोष्ट पाहिली पाहिजे· आकाश पवित्र जागा आहे तेथें पाप अगदीं नाहीं· जसा देव पवित्र मनाचा आहे तसे आकाशांतले सर्व राहाणारे पवित्र मनाचे आहेत· त्यांस पापबुद्धि किंवा पापवासना अगदीं नाहीं· देवाचें मन आणि आकाशांतल्या राहाणाऱ्यां पवित्र दूतांचें मन एकच आहे देवास जें चांगलें वाटतें तें त्यांसही चांगलें वाटतें देवास जें वायीट वाटतें तें त्यांसहि वाईट वाटतें· ते सर्व पवित्र असतांनां जें कांहीं पवित्र असतें तें त्यांस प्रिय तर देव आपण परम पवित्र असतांनां आणि सर्व पवित्रपणाचा आणि चांगुलपणाचा कंद असतांनां देवपणावरत्यांचा परम प्रेम असतो· आकाशांतल्या राहणाऱ्यांची गोष्ट असी असतां ते देवाच्या आज्ञा फार प्रीतिनें मानितात· देव पवित्र असतां तेहि पवित्र असतां देवाचें मन आणि त्यांचें मन एकच असतां जी कोण्ही



आज्ञा देव करितो त्यांस फार गोड असती ते तिला तेव्हांच मानितात· देवाच्या आज्ञा मानण्याविषयीं कोण्ही गमत नाहीं कोण्ही मनांत कुडत नाहीं कोण्ही कुरबुर करीत नाहीं· देवाच्या आज्ञा मानण्यांत त्यांस फार हर्ष वाटतो ह्मणून सदां सर्वकाल फार उत्साहें करून मानितात आकाशांत कोण्ही गर्वी नाहीं आकाशांतले राहणारे सर्व नम्र आहेत· देवाचें तेज व प्रताप व मोठेपणा पाहून त्याच्या आज्ञा फार नम्रपणानें मानितात· आकाशांत देवासीं कोण्ही आड होत नाहीं त्याची इच्छा बिनदिक्कत चालती· पृथ्वींत देवाची इच्छा असी चालत नाहीं· पृथ्वीवरचीं सर्व मनुष्यें देवाच्या प्रजा आहेत आणि देवाच्या आज्ञा मानणें हें त्यांस लागतें हें त्यांचा धर्म खरा परंतु मनुष्य जाति देवापासून फितल्यामुळें सर्व मनुष्यें जन्मापासून देवासीं आड असतात· देवाच्या आज्ञा मानण्यांत त्यांस आनंद वाटावा परंतु त्यांची बुद्धि पापानें बिघडली ह्मणून त्यांस वाटत नाहीं· त्यांच्या अंतःकरणाचे डोळे आंधळे झाले ह्मणून जें त्यांस चांगलें वाटावें तें वायीट वाटतें आणि जें वायीट वाटावें तें चांगलें

वाटतें असें कीं देवाच्या आज्ञा मानणें जें गोड वाटावें तें कडू वाटतें परंतु पाप करणें जें कडू वाटावें तें गोड वाटतें ही मनुष्य जातीची गोष्ट आहे· जन्मापासून जातिस्वभावाने सर्वांचें मन देवापासून पापाकडे लागलेलें असतें परंतु पवित्र आत्म्यानें कित्येकांचें मन पालटलेलें जातें मग देवाच्या आज्ञा त्यांस गोड वाटतात मग देवाच्या आज्ञा मानण्यांत त्यांस हर्ष होतो आकाशांतल्या दूतां सारिखे ते देवाच्या आज्ञा मानूं लागतात ही थोडक्यांची गोष्ट आहे परंतु सर्वांची गोष्ट असी असावी सर्व पृथ्वी वरच्या माणसांची गोष्ट असी होईल तेव्हां मात्र पृथ्वीचें कल्याण होईल·

ज्या घरचा धनी ज्ञानी आहे न्यायी आहे दयाळू आहे पवित्र मनाचा आहे आणि जी कोण्ही आज्ञा तो करितो ती उत्तम पवित्र ज्ञानाची आणि न्यायाप्रमाणें असती आणि त्या घर धन्याचीं मुलें माणसें फार प्रीतीने व उत्साहाने त्याच्या आज्ञा मानितात त्या घरांत किती सुख हो· असा घर धनी देव आहे आणि अशा मनाने आकाशांतले राहणारे त्याच्या आज्ञा मानितात तर



आकाशांतलें सुख किती हो· जो राजा परम बुद्धिमान् नीतिमान् शक्तिमान् व प्रजांवर दयावान् आणि त्याच्या प्रजा फार प्रीतीने आणि नम्रपणाने त्याच्या आज्ञा मानितात तें राज्य कसें चांगलें राज्य आहे त्यांतल्या प्रजांस किती सुख मिळतें· असा राजा देव आहे आणि आकाशांतले दूत अशाच प्रजा आहेत· आकाशाची गोष्ट जसी आहे तसी पृथ्वीची गोष्ट असावी ह्मणून आकाशांत तुझी इच्छा जसी चालती तसी पृथ्वींतहि चालो ही प्रार्थना करावयास येशू ख्रीस्तानें आपल्या शिष्यांस शिकविलें·

## आमची नित्याची भाकर आज आह्मांस दे

पोटासाठीं लोक कसे श्रम करितात किती कष्ट करितात किती काळजी बाळगितात थोडक्याने समाधान पावत नाहींत फार पाहिजे· दिवसानदिवस खायाला पांघरायाला मिळालें तर पुरे वाटावें परंतु पुरें वाटत नाहीं मोठा संग्रह पाहिजे पुष्कळ वर्षांची बेजमी पाहिजे नाहीं तर शांत होत नाहींत· चांगली खायाजोगी भात भाकर तेणेंकरून संतोष मानावा

परंतु मानत नाहींत पक्कान्नें मिष्टान्नें पाहिजेत नाहीं तर सुख वाटत नाहीं· लोक जर थोडक्याने तृप्त असतात जर केवळ चांगल्या भात भाकरीने संतोष मानितात तर इतके कष्ट न लागतात· लोकांच्या लोभामुळें आणि अविश्वासामुळें इतके कष्ट घडतात लोभ नसता तर चांगली भात भाकर मिळाल्यावर संतोष वाटता· अविश्वास नसता तर पुष्कळ वर्षांच्या बेजमीची काळजी नसती· चालत्या दिवसाला खायाला आहे तर देवाचा उपकार मानून आनंद वाटावा उद्यांचा दिवस आल्यावर आपण देवावर भरवसा ठेवून उद्योग करूं त्या उद्योगाला देव सफल करील मग उद्यांला खायाला मिळेल असें लोकांचें मन असावें· देवावर विश्वास असता तर असें मन असतें परंतु बहुत करून लोकांचें मन फार निराळें आहे बहुतकरून लोक देवाला अगदीं विसरतात देवाच्या आशीर्वादावांचून आपले उद्योग निष्फळ ह्याची आठवण अगदीं सोडितात आपल्या उद्योगावर मात्र आपल्या बळावर मात्र विश्वास ठेवितात अशांचें मन फार वायीट आहे· सर्वांचें मन एक नाहीं देवाला विसरीत नाहींत



देवच खायाला देईल असा भाव धरितात असीं बहुत माणसें आहेत परंतु त्यांस आळस फार आळसामुळें तीं आपण उद्योग करीत नाहींत रिकामीं बसतात आणि खुशाल निजतात अशांचेंहि मन फार वायीट आहे तर चांगलें मन कसें ह्मणून जर पुसतात तर असें देवांवर पूर्ण भाव ठेवावा देवावर भाव ठेवल्यामुळें सर्व काळजी टाकावी मनांतून अगदीं घालवावी तरीं आळस देवाला फार वायीट वाटतो आळस सोडावा उद्योग करावे ही त्याची आज्ञा आहे हें आठवून पुरते उद्योग करावे हें चांगलें मन·

पापाचा खेद करून पापाला सोडून येशूला शरण जाऊन देवाचीं लेंकरें झालीं असीं जीं माणसें त्यांस लोभ नसावा परंतु थोडक्याने.त्यानी समाधान पावावें· चांगली भात भाकर मिळाली तर तेणें करून त्यानी संतोष मानावा· गुजरत्या काळाची बेजमी आहे तर देवाचा उपकार मानून पुढच्या काळाची काळजी त्याने सोडावी हें दर्शवायासाठीं आमची नित्याची भाकर आज आह्मास दे असी प्रार्थना करावयास येशूने शिकविलें·

येशू ख्रीस्तावर विश्वास ठेऊन देवाचीं लेंकरें झालीं जीं माणसें त्यांस काळजी कां वाटावी त्यांचा आकाशांतील बाप त्यांचा संभाळ करणारा आहे सगळी सृष्टि त्यांच्या आकाशांतील बापाचीच आहे तर त्यांस चांगली उपयोगी कल्याण कारक होईल अशा कोण्हे एके गोष्टीची वाण होणार नाहीं ह्मणून त्यांस काळजी नसावी· देवाचीं लेंकरें ह्या लोकीं जसीं परदेशी आठवडेवायीक माणसें तसीं आहेत· त्यांचें घर एथें नाहीं त्यांचें घर आकाशांत आहे· त्यांचें वतन एथें नाहीं त्यांचें वतन आकाशांत आहे· तीं ह्या लोकीं असतांना घराकडे चालत आहेत जोंपर्यंत ह्या जगांत आहेत तोंपर्यंत वाटेवर आहेत देवाज्ञा त्यांस झाली ह्मणजे त्यांचें चालणें संपलें तीं घरास पहोंचलीं वाटेवर सुख भोगायाला वाटसरू पहात नसतो· घरास पहोंचल्यावर सुख होईल असी आठवण करून वाटेवर पोटाला भात भाकर मिळाली तर संतोष मानितो त्यापेक्षां अधिक मिळालें तर देवाची कृपा आहे असें ह्मणून देवाचा उपकार मानितो· देवाच्या लेंकरांची गोष्ट असीच आहे घरीं पहोंचल्यावर बापापासीं निरंतर



पवित्र सुख मिळेल हें आठवून संसाराच्या सुखावर चित्त ठेवीत नाहींत परंतु अल्पसंतोषी असतात· देवानें जर संपत्ति दिल्ही तर गरीब गुरीबांवर दया करून भुकेल्यांस खायाला घालितात नागव्यांस पांघरवितात रोग्यांचा समाचार घेतातात अज्ञानी जे आहेत त्यांस ज्ञान यावें ह्मणून जागोजाग शाळा स्थापितात ह्या वाटांनी संपत्तीचा सद्व्यय करितात·

आणि जसें आह्मी आपल्या ऋण्यांस सोडितों
तसें तूं आमचीं ऋणें सोड

कोण्हा एकानें दुसऱ्यावर अपराध केला तर तो त्या अपराधामुळें त्याचा ऋणी झाला· आह्मी देवाच्या आज्ञा मोडल्या तर आह्मी देवाचे घरीं ऋणी झालों· आमचीं ऋणें देवानें सोडावीं असी आमची इच्छा आहे तर आह्मी आपल्या ऋण्यांस सोडिलें पाहिजे ह्मणजे त्यांच्या अपराधांची क्षमा केली पाहिजे· दुसऱ्यानें आपलें कांहीं वायीट काम केलें तर त्या वायीट कामामुळें पोटामध्यें द्वेष बाळगितो ज्यानें वायीट केलें तो पस्तावून आला आणि पायां पडून म्यां वायीट केलें माझी क्षमा कर असें बोलू लागला तरीं द्वेष सोडीत नाहीं असा जो तो

देवाच्या दृष्टीस फार दुष्ट आहे· सर्व मनुष्यानी एकमे-
कावर प्रीति करावी ही देवाची आज्ञा आहे मनुष्यजा
ति ह्मणून एक कुटुंब आहे सर्व मनुष्यें भाऊ बहिणी
आहेत तर भाऊ बहिणीनी एकमेकासीं भांडावें हें फा
र वायीट आहे परंतु भाऊ बहिणीनी परस्पर प्रीतिबा
ळगावी हें फार योग्य आहे हें फार शोभतें·

एकाने दुसऱ्यावर अपराध केला तर त्या दुसऱ्या
ने तो अपराध त्याला दाखवावा वसवसून गुरकावून दा-
खवावा असें नाहीं परंतु भायीबंदीने दाखवावा अपरा
धकरी पस्तावला आणि आपला अपराध पदरीं घेऊ
न क्षमा मागूं लागला तर त्याची क्षमा करावी आणि
त्याने जो अपराध केला तो मनांतून घालवावा· अपरा
धकरी पस्तावत नाहीं त्यास किती बोलला तरीं समं-
जत नाहीं ऐकत नाहीं असें आहे तर त्याने जो अपरा
ध केला त्याचा हिशोब देव घेईल हें आठवून त्याला जा
ऊं द्यावें· मी सूड घेईन सूड घेतल्यावांचून मी सोडाया
चा नाहीं असें कोण्ही बोलूं नये असें कोण्ही मनांत आ
णूं नये सूड घेण्याचा अधिकार कोण्हा मनुष्याकडे ना
हीं सूड घेण्याचा अधिकार केवळ देवाकडे आहे· देव



सृष्टीचा राजा आणि न्याय करणारा आहे· शेवट त्या
दिवसीं तो सर्व मनुष्यांचा न्याय करील तेव्हां तो सर्वपा
पाचा सूड घेईल तर आपणास कोण्हा एकानें कांहीं वा
यीट काम केलें तर त्याची गयी करावी हें योग्य तरीं त्या
नें जें वायीट केलें तें राज्याच्या बंदोबस्तासाठीं कायदे
झाले त्यांस मोडून त्याने केलें तर सरकारांत गोष्ट न्या
वी हें बहूत करून चांगलें असतें· त्याचा सूड घ्यावा
ह्या बुद्धीने नाहीं परंतु त्याला दंड बसल्यावर त्याला धा
क व्हावा मग त्या धाकाने त्याने वायीट काम सोडावें
आणखी हि त्याचा दंड आठवून सर्व लोकांस वायीट का
म करण्याविषयीं धाक बसावा ह्या बुद्धीने सरकारांत
गोष्ट न्यावी उत्तम आहे· दुष्टांचा दंड आणि भल्यांचा-
संभाळ करावयासाठींच राजे आणि न्यायाधीश राजे त्यां
स देवाने अधिकार दिल्हा आहे तर असें वायीट का
म फिरून न घडावें ह्या बुद्धीने दुसऱ्याने केलेले वायी
ट कामाची नालिस्त सरकारांत जो करितो तो चांगलें
करितो परंतु सूड घेण्याच्या बुद्धीने जो नालिस्त करि
तो तो वायीट करितो असें समजा· दुसऱ्याने जें वायी-
ट केलें तें सरकारचे कायदे मोडून केलें नाहीं किंवा

आपली दाद सरकारांत लागत नाहीं असें आहे तर
सूड घेण्याचें मन अगदीं दूर करून तें वाईट काम आ
पण पोटांत घालावें·

एकमेकावर दया करण्याची बुद्धि एकमेकां-
च्या अपराधांची क्षमा करण्याची बुद्धि फार सुंदर
फार उत्तम आहे· ही बुद्धि सर्वांची बुद्धि असती तर
सर्वांचें कल्याण असतें सर्वत्र तंटे बखडे नाहींसेअ
सतात· ही बुद्धि अवश्य बाळगिली पाहिजे हें दाख
वायासाठीं जसें आह्मी आपल्या ऋण्यांस सोडितों त
सें तूं आमचीं ऋणें आह्मास सोड ही प्रार्थना कराव-
यास येशूने शिकवलें· ही बुद्धि जो बाळगीत नाहींत्या
जवर देव दया करणार नाहीं हें येशूनें साफ सांगितलें
आहे· तर ही फार भारी गोष्ट आहे ही गोष्ट ध्यानावर
आणून खोल विचार केला पाहिजे· आह्मी दुसऱ्यांचे
अपराध सोडीत नाहीं तर देव आमचे अपराध सो
डणार नाहीं मग ह्या गोष्टीविषयीं काळजी धरिली पा-
हिजे· दुसऱ्यानी आह्मावर केलेले अपराध थोडे आ
हेत परंतु आह्मी देवाच्या आज्ञा मोडून अपराध के
ले ते किती डोयीवरचे केंस समुद्राच्या किनाऱ्यास



वाळूचे खडे कोण्हा एकाच्याने मोजवतील तरीं आमचे
अपराध मोजतां येणार नाहींत· आह्मी जन्मापासून म
रणपर्यंत देवाची सेवा करावी देवावर प्रीति ठेवावी
देवाच्या आज्ञा पाळाव्या देवाने जे उपकार आह्मावर
केले ते मानावे हें सर्व जन्मापासून मरणपर्यंत केलें
पाहिजे ह्यांत चूक पडली तर ऋण घडलें असें आहे
तर आमचीं ऋणें किती हाय हाय दिवसान दिवस
वाढत जातात· आह्मी दुसऱ्यांचीं थोडीं ऋणें सोडीत
नाहीं तर आमचीं इतकीं ऋणें देव कसा सोडील हो
आह्मी दुसऱ्यांवर दया केली नाहीं तरीं देव आह्मावर
दया करील असें कसें कल्पावें·

ही बुद्धि जी बाळगावी ह्मणून येशूने शिकवलें
ती त्याने आपण बाळगिली· येशूच्या वैऱ्यानी त्याला
धरून कुसावर बांधलें होतें तेव्हां हे बापा जें करिता-
त तें अज्ञानाने करितात त्यांची क्षमा कर असी प्रा
र्थना त्यांजविषयीं त्याने देवापासीं केली· येशूने का
हींच अपराध केला नसतां त्याच्या वैऱ्यानी त्याला ध-
रिलें तरीं सूड घेण्याची बुद्धि टाकून त्याने त्यांजवर इ
तकी दया केली· येशूच्या सर्व शिष्यानी असीच बुद्धि

अवश्य बाळगिली पाहिजे· असी बुद्धि जो बाळगी-
त नाहीं तो येशूचा खरा शिष्य नाहीं· सूड घेण्याची बु
द्धि गर्वापासून उत्पन्न होती गरीब निरहंकारी असें जें
मनुष्य त्याच्या मनांत सूड घेण्याची इच्छा एकाएकीं
उठत नाहीं· दुसऱ्याने जरीं शिवी दिल्ही किंवा तोंडांत
मारिलें तरीं एकाएकीं रागास चढत नाहीं देवाची प्रा
र्थना करून रागास चेपितो परंतु गर्वी अहंकारी असें
जें मनुष्य त्याच्या मनासारिखें नाहीं असें दुसऱ्याने कां
हीं ह्मटलें किंवा कांहीं केलें तर तेव्हांच त्याला राग ये
ऊन सूड घेण्याची इच्छा मनांत उठती· मी मोठा मी श्रे
ष्ट सर्वांनी माझ्या पायां पडावें तर मला कोण्ही उलटू-
न बोलतो हें काय असें अहंकारी मनुष्यास वाटत अ
सतें· मग दुसऱ्यांवर दया करण्याची बुद्धि व्हावी दुसऱ्यां
च्या अपराधांची क्षमा करण्याची बुद्धि व्हावी तर आ
धीं आपण देवाच्या आज्ञा मोडून किती अपराध केले
आहे हे आठवून अहंकार दूर करावा· आपण केले जे
अपराध त्यांची आठवण जोंपर्यंत आहे तोंपर्यंत दु
सऱ्यांची क्षमा करणें कठीण नाहीं ह्मणून आप-
ल्या अपराधांची आठवण सर्वकाळ बाळगिली



पाहिजे:

## आह्मास परीक्षेंत नेऊं नको

मनुष्यजाति पापामुळें चांगल्या चालीविषयीं
अशक्त आहे· देवाची सेवा करावी देवाची भक्ति क
रावी देवाच्या आज्ञा मानाव्या देवाचें भय धरून वा-
गावें हें मनुष्य जातीला लागतें मनुष्यजातीचा धर्म
हाच आहे परंतु पहिल्या स्त्री पुरुषाच्या पापामुळें
सर्व मनुष्य जातीचा स्वभाव पापी आहे· जन्मापासू-
न सर्वांचें मन पापाकडे लागलेलें असतें पापांत मा
त्र गोडी वाटती देवाच्या सेवेंत भक्तींत गोडी वाटत ना
हीं सर्वांचा जातिस्वभाव असाच आहे परंतु कित्येकां
चें मन देव फिरवितो पवित्र आत्म्याकडून त्यांच्या अं
तःकरणाचे डोळे उघडवितो मग पापाचा दुष्टपणा
त्यांस दिसतो आणि पापाचें ओझें त्यांस जड वाटतें ह्या
ओझ्यापासून मोकळीं होण्यासाठीं देवाला शरण ये-
तात आणि मनुष्यांचा उद्धार साधावयासाठीं देवाने
जो उपाय केला त्या उपायाचा अंगीकार करितात अ
सी त्यांची अवस्था फिरती· पहिले पापांत मात्र गोडी
वाटत असे आतां देवाने त्यांचें मन पालटल्यावर

पापाची गोडी जाऊन देवाच्या सेवेंत गोडी वाटती· पहिलें काम क्रोध लोभ आणि असे जे दुर्गुण ह्यांस तीं वश्य असत परंतु आतां देवाच्या कृपेकरून त्यानी काम क्रोध लोभ इत्यादिकांस वश्य केलें आहे· तथापि हे दुर्गुण वश्य जरीं झाले तरीं उपटले नाहींत अझून मनामध्यें वसतात त्याला दृष्टांत घ्या· कोण्हा एकाला कठीण रोग लागला मग वैद्याने औषध पाणी करून दिल्ह्यावर रोग कमी झाला ह्यानंतर तो रोगी जपून चालला तर बरा होत जाईल परंतु कांहीं अपथ्य खाल्लें तर रोग परतेल· राज्यामध्यें कोण्ही बंड उठलें राजा लौकर फौज मिळवून त्याजवर आला तर त्याचा पराभव करील मग बंड दडून राहील· राजा सावध राहिला तर पुढें भय नाहीं परंतु राजा गैर सावध झाला तर त्याचा शत्रु उपट खाईल· तसें काम क्रोधादि दुर्गुण जे पवित्र आत्म्याच्या कृपेकरून वश्य झाले ह्यांजविषयीं आपण जपून चाललें पाहिजे नाहीं तर उपट खातील आणि प्रसंग आल्यावर आपला पराभव करितील· हे दुर्गुण दडून लपलेले शत्रु आहेत ह्यांजविषयीं कोण्ही गैर सावध झाला तर लौकर उठतात· जसें



दारूला कोण्ही तोडा लाविला असतां दारू पेटतील तसें मनुष्य गैर सावध असल्यास त्याचे दुर्गुण काम क्रोधादि पेटण्याचा प्रसंग आल्यावर पेटतात· आपली शक्ति किती आपण स्थिर राहूं किं ढळुं आपले दुर्गुण वश्य राहतील किंवा उठतील ह्या गोष्टीविषयीं आपली कठीण परीक्षा जेणें करून होईल असा प्रसंग आपणावर न यावा ह्मणून आह्मास परीक्षेंत नेऊं नको असी प्रार्थना करावयास फार योग्य आहे· आमची अशक्ति आमच्या मनांत ध्यानात रहावी आह्मी आपल्या बुद्धीवर विश्वास न ठेवावा ह्मणून ही प्रार्थना करावयास येशूने शिकवलें· ही प्रार्थना जो करितो तो जपून वागला पाहिजे· मनापासून ही प्रार्थना जो करितो तो जपूनच वागेल कांकिं त्याचें जपणें त्याच्या खरेपणाची खूण आहे· पापाचें भय आहे पापांत पडण्याची चिंता बाळगितो ह्मणूनच ही प्रार्थना करितो असें आहे तर ज्याचें भय त्याला लागलें त्याविषयीं तो गैर सावध कसा होईल· गैर सावध असला तर ही प्रार्थना मनापासून केली नाहीं ढोंगाने मात्र केली असें निश्चयें समजावें· मला

परीक्षेंत नेऊं नको असी देवाची प्रार्थना करून आप
ण आपसुखेंच परीक्षेंत जातात असीं बहूत माणसें
असतात सावधपणा टाकून ज्याच्याने बहूत करून
पापांत पडतील असे प्रसंग आपणावर आणितात
जेथें त्यांचे दुर्गुण चेतविले जातील अशा ठिकाण्यां
त जातात ज्यांच्या संगतीने बहूत करून भूलतील
अशांची संगत धरितात परंतु हें फार वायीट· पाप
घडण्याच्या प्रसंगांत जो आपसुखें जातो तो पापा
सून माझें रक्षण कर असें देवापासीं कसें मागेल·

## परंतु दुष्टापासून तार

हें जग एक वाट आहे ह्या वाटेवर सर्व माण
सांस चालावें लागतें· ह्या वाटेवर जागोजाग पाश ठे
वलेले आहेत· जागोजाग खोल खांची खोदलेल्या
आहेत· जागोजाग वाट फार खचरट आहे फार ख
डकळ फार खडबडीत आहे· जागोजाग चोर फिर
तात· आरंभापासून शेवटापर्यंत सर्व वाटेवर वाट
सरुचा घात करावयासाठीं एक कठीण क्रूर कपटी
जबर जलाल असा दुशमन प्रसंग पाहत असतो·



ह्या वाटेवर चालणाऱ्या मनुष्याच्याने आपला संभा
ळ करवत नाहीं ह्या वाटेवरच्या भयापुढें मनुष्याची
बुद्धि चालत नाहीं मनुष्याची शक्ति चालत नाहीं दे
व संभाळेल तरच वाटसरू सुखरूपें शेवटास प्रोहों
चेल देवाने संभाळ केला नाहीं तर निश्चयें वाटसरू
चा घात होईल ह्मणून आह्मास दुष्टापासून तार ही
प्रार्थना करावयास येशूने शिकवलें· वाट असी आ
हे वाटेवरचें भय असें आहे आपली अशक्ति असी
आहे तर किती मिन्नतीने ही प्रार्थना आह्मी करावी·
ह्या वाटेवर चालणाऱ्यांचा दुशमन तो सैतान आहे·
सैतान तो सर्व मनुष्य जातीचा सत्यनाश करावयास
पाहतो· मनुष्यांस पाशांत पाडावें भुलवावें भ्रांत क
रावें हें त्याचें काम सर्व मनुष्यांस नरकांत बुडवावें
ही त्याची इच्छा आहे· कित्येकांचा मोह करितो कि
त्येकांस भय दाखवितो सर्वांचा स्वभाव पाहून प्रत्ये-
काच्या स्वभावाप्रमाणें त्यासीं वागतो कोण्हाला ह्या
रीतीने कोण्हाला त्या रीतीने पापांत पाडण्याचा उद्यो
ग करितो· हा दुशमन कधीं थकत नाहीं कधीं राह-
त नाहीं सदां सर्वकाळ मनुष्यांचा घात करण्याचा

उद्योगांत असतो· जसा वाघ शेरडांस मारावयासपा
हतो तसा सैतान मनुष्यांचा घात करावयास पाहतो·
असा आमचा दुशमन आहे तर किती मिन्नतीनेआ
ह्मास तार ह्मणून आह्मी देवाची प्रार्थना केली पाहिजे·

सर्व मनुष्यें जातिस्वभावाने पापी असतांनांत्यां
चें मन पालटल्या पावेतों सैतानाला वश्य आहेत
सैतानाच्या आज्ञा मानतात आणि त्याच्या मनासा
रिखें वागतात· सैतान आलम दुन्येचा देव आलम
दुन्या त्याची सेवा करिती सैतान आलम दुन्येचा रा-
जा आलम दुन्या त्याच्या आज्ञांत राहती त्याचें नांव
एकच आहे असें नाहीं त्याचीं नावें बहूत आहेत· नि-
रनिराळ्या देशांत निरनिराळीं नावें देऊन लोक त्याची
भक्ति करितात· यहोवा जो एकलाच जीवंत खरा देव
आहे ह्याची भक्ति जितकीं माणसें करीत नाहींत ति
तकीं सैतानाची भक्ति करितात· लाकडाची किंवा मा
तीची किंवा धातूची मूर्ति करून त्या मूर्तीची पूजा
करितात असीं जीं माणसें तीं सर्व सैतानाची पूजा
करितात तीं सर्व सैतानाला वश्य आहेत· मूर्ति पू-
जा करीत नाहींत तरीं देवाचें ज्ञान व्हावें ह्मणून देवाने



जें पुस्तक लिहविलें ह्यांत पाहून देवाचें ज्ञान शिक-
त नाहींत परंतु आपल्या मनामध्यें देव कल्पितात
असींजीं माणसें तीं सर्व सैतानाला वश्य आहेत·
नांवानें यहोवाचे भक्त आहेत यहोवाने जें पुस्तक
लिहविलें तें वाचितात परंतु पापाचा खरा पश्चात्ता
प त्यांस झाला नाहीं. एकला जो तारणारा ह्मणजे ये
शूख्रीस्त ह्याजवर त्यांचा खरा भाव बसला नाहींअ
सींजीं माणसें तीं सर्व सैतानाला वश्य आहेत एकू-
न जो कोण्ही पापाच्या मार्गांत चालत आहे तो सैता
नाला वश्य आहे· असी गोष्ट आहे तर आलमदुन्या
सैतानाला वश्य आहे ह्याविषयीं संशय नाहींच· को-
ण्हा एकाला पापाचा खरा पश्चात्ताप झाला पापाचें
ओझें जड वाटून एकला जो तारणारा ह्मणजे येशू
ख्रीस्त ह्याला शरण आला मग तो सैतानापासून मो
कळा होतो पुढें सैतान त्याचा धनी नाहीं पुढें येशू
ख्रीस्त त्याचा धनी आहे सैतानाच्या हातांतून सुट
लीं आणि त्यापासून मोकळीं झालीं असींजीं माण
सें ह्यांचा द्वेष सैतान विशेषें करून करीत असतो
आणि ह्यांच्या पाठीस लागत असतो· त्यांस पुनः

वश्य करावें ह्मणून तो फार झटत असतो तर सै-
तानाच्या हातांतून सुटलीं जीं माणसें आह्मास दु
ष्टापासून तार ही प्रार्थना ह्यानी किती मिन्नतीने क
रावी· ही प्रार्थना मनापासून करितात जीं माणसें
त्यांस देव सहाय होतो आणि त्यांस सैतानापासून
तारितो· ज्या वाटेवर चालतात ती फार मोठ्या भ-
याची वाट जरीं आहे तरीं पापापासून सैतानापा-
सून आणि सर्व वायीटापासून त्यांस तारून देव त्यां
स सुखरूपें शेवटास पहोंचवितो·

कांकिं राज्य सामर्थ्य आणि प्रताप हीं
सर्व काळ तुह्मींच आहेत तथास्तु

ज्याची प्रार्थना आपण करितों तो कृपाळू आ
हे आणि समर्थ आहे तर आपण भरवसा धरून
त्याची प्रार्थना करितों परंतु ज्याची प्रार्थना आप
ण करितों त्याच्या कृपेविषयीं किंवा त्याच्या सामर्थ्या
विषयीं संशय आहे तर आपण निरुत्साहाने त्या
ची प्रार्थना करितों· देवाच्या कृपेविषयीं देवाच्या
सामर्थ्याविषयीं संशय बाळगायाची कांहींच जा
गा नाहीं· पापाचा खरा पश्चात्ताप पावून येशू



ख्रीस्ताला शरण आलीं असीं जीं माणसें तीं देवा
चीं लेंकरें झालीं मग देव त्यांचा बाप असतांना देवा
च्या कृपेविषयीं त्यांस संशय कसा होईल· मनुष्यें दु
ष्ट आहेत तरीं आपल्या लेंकरांवर कृपा करितात
आणि त्यांस जीं पाहिजेत तीं फार खुशीनें त्यांस
देतात मग देव परम कृपाळू परम दयाळू देव तो
किती विशेषें करून आपल्या लेंकरांवर दया करी
ल आणि त्यांस जीं पाहिजेत तीं त्यांस देईल· ख-
रेपणाने वागणारे ह्मणजे देवाचीं लेंकरें ह्यांस को-
ण्हाएके चांगल्या गोष्टीविषयीं देव नाहीं ह्मणाया-
चा नाहीं असें देवाच्या पुस्तकांतलें एक वाक्य आहे·

जसें देवाच्या कृपेविषयीं संशय नाहीं तसें
देवाच्या सामर्थ्याविषयीं संशय नाहीं· देव सृष्टीचा
राजा सर्व शक्तिमान् राजा आहे तर देवाला असा-
ध्य किंवा कठीण असें कांहीं नाहीं· सामर्थ्य सत्ता आ
णि अधिकार ह्यांचा धनी देव आहे सर्व सामर्थ्याचें
आणि सत्तेचें मूळ कारण देव आहे सर्व सामर्थ्याचें
आणि सत्तेचें अधिष्ठान देव आहे ह्यावरून देवाच्या
लेंकरानी पुरता भरवसा धरून देवाची प्रार्थना

केली पाहिजे हें दाखवावें ह्मणून कांकिं राज्य सामर्थ्य आणि प्रताप हीं सर्वकाळ तुझींच आहेत असें ह्मणायाला येशूने शिकवलें. जसें आरंभीं देवाच्या माहात्म्याचें वर्णन करावें तसें शेवटींहि करावें असें त्या शब्दांवरून येशूने शिकवलें.

सृष्टीचें राज्य माझ्या बापाचेंच आहे माझा बाप सर्व शक्तिमान् आहे त्याची शक्ति सर्वत्र चालती त्याला कांहींच कठीण नाहीं. माझा बाप परम तेजस्वी आणि प्रतापी आहे असें मनांत आणून देवाचें प्रत्येक लेंकरूं मोठा आनंद पावतें. देवाचेंच राज्य असावें देवाचें सामर्थ्य सर्वत्र चालावें देवाचें गोरव सर्वांनी करावें हें उत्तम आहे हें समजून देवाचीं लेंकरें अंतःकरणापासून तथास्तु ह्मणतात..

येशू ख्रीस्ताने जी प्रार्थना आपल्या शिष्यांस शिकवली तिजवर टीका म्यां असी केली आहे. अहो माझ्या मित्रानो माझ्या गोष्टी ध्यानावर आणा ह्या प्रार्थनेचा खोल विचार करा. ही प्रार्थना लाहान आहे तरीं किती अर्थ आहे. येशू खरा होता येशू देवाचा पुत्र होता येशू सद्गुरु होता ह्या गोष्टींला



ही प्रार्थना पुरतें प्रमाण आहे. हें प्रमाण पाहाहो तोलून पाहा. येशू केवळ मनुष्य होता तर असी प्रार्थना त्याला न सुचती असी प्रार्थना तो आपल्या शिष्यांस न शिकवता. येशू केवळ मनुष्य होता तर संपत्ति मागावी मोठेपणा मागावा कीर्ति मागावी थोर पदवी मागावी राज्य मागावें विषयसुख मागावें असें तो आपल्या शिष्यांस शिकवता. असत्याच गोष्टी माणसांच्या ध्यानांत वागतात असत्याच गोष्टींविषयीं मात्र लोक प्रार्थना करितात. मला बायको व्हावी मला मूल व्हावें मला द्रव्य व्हावें मला चांगला रोजगार व्हावा मला चौघांमध्यें मोठें नांव व्हावें मला शत्रूवर जय व्हावा मला दुशमनाचा घात व्हावा मला शरीराचें समाधान व्हावें मला विद्या व्हावी मी पंडित होऊन लोकानी माझा मान करावा अशा प्रार्थना लोक नित्य करीत असतात. कोण्ही ही गोष्ट मागतो कोण्ही ती गोष्ट मागतो परंतु आपला थोरपणा वाढावा आपणास सुख व्हावें हाच सर्वांच्या प्रार्थनेचा सारांश असतो. देवाचा मान सर्वांनी करावा. देवाचें नाम सर्वांनी

पवित्र मानावें सैतानानें बुडून देवानें राज्य सर्वां-
वर यावें देवाची इच्छा सर्वत्र चालावी असल्या
गोष्टी कोण मागतो· लोक देवाला विसरितात लो
क देवाला पाठीमागें टाकितात लोक देवाचा अप
मान करितात ह्या गोष्टींला कोण रडतो· पाप जा
वें पवित्रपणा सर्वत्र वाढावा त्याची इच्छा कोण ध
रितो त्यांविषयीं कोण प्रार्थना करितो मला परी-
क्षेंत नेऊं नको परंतु मला पापापासून आणि सैता
नापासून तार असें देवापासीं कोण मागतो· ह्या
गोष्टी लोक मागत नाहींत तरीं ह्याच गोष्टी मोठ्या
आहेत त्याच गोष्टी मागितल्या पाहिजेत असें आ·
पापल्या बुद्धीला विचारिलें असतां तुमची बुद्धि तु
ह्मास सांगेल· देव परम कृपाळू परम दयाळू परम
पवित्र परम न्यायी असतांना देव आपला राजा
आपला धनी आपला पोसणारा आणि संरक्षण क-
रणारा असतांना देवाची प्रतिष्ठा आपल्या पोटापे
क्षां आपल्या सुखापेक्षां आह्मास प्रिय असावी
तरीं आपापल्या पोटांची काळजी सर्व बाळगि-
तात देवाच्या प्रतिष्ठेची काळजी कोण्ही बाळगीत



नाहीं·

लोक प्रार्थना करितात तसी ही प्रार्थना ना-
हीं· लोक केवळ संसाराच्या गोष्टींविषयीं प्रार्थना क
रितात· देवाचा मोठेपणा देवाची प्रतिष्ठा ह्या गोष्टी
लोकांच्या मनांत येतच नाहींत परंतु येशू ख्रीस्ता
नें जी प्रार्थना आपल्या शिष्यांस शिकवली ही फा
र वेगळी आहे· ह्या प्रार्थनेंत सात गोष्टी मागित·
ल्या आहेत ह्मणजे १ देवाच्या नामाचा मान २
देवाच्या राज्याचें येणें ३ देवाच्या इच्छेचें चालणें
४ चालत्या दिवसाला अन्न मिळणें ५ पापाची
क्षमा ६ परीक्षेपासून रक्षण ह्मणजे पापांत पड-
ण्याच्या प्रसंगापासून रक्षण ७ दुष्टापासून तारण
ह्या सात गोष्टी मागावयास येशूने आपल्या
शिष्यांस शिकवलें· लक्ष द्याहो ही प्रार्थना कसी आ
हे हें पुरतेपणी पाहा· सात गोष्टी मागितल्या आहे
त त्यांतून पहिल्या तीन गोष्टी देवाच्या मोठेपणावि
षयीं आहेत चौथी गोष्ट ती एकच गोष्ट संसारावि
षयीं मागितली आहे· ही गोष्ट कसी पुष्कळ द्रव्य ह्या
वें बहुत वर्षांची बेगमी ह्यावी असें नाहीं परंतु

चालत्या दिवसाला अन्न मिळावें असीच आहे म
ग तीन शेवटल्या गोष्टी आत्म्याच्या उद्धाराविषयीं
आहेत·

संसाराच्या गोष्टी देहाच्या गोष्टी हलक्या आहे
त आत्म्याच्या उद्धाराच्या गोष्टी त्या मोठ्या आहेत अ
सें ह्या प्रार्थनेवरून समजा हो· संसाराच्या गोष्टींवि-
षयीं प्रार्थना करूंच नये असें नाहीं करूं नये असें
देवाने कांहीं सांगितलें नाहीं· रोग आहे किं आंगा
ला कोठें दुखतें तर समाधान मागावें रोग जाऊन
शरीर संपत्ति व्हावी हें मागावें· रोजगार नाहीं तर
मागावा ह्या गोष्टी मागण्यास बाध नाहीं· ह्या गोष्टी
पाहिजेत तर मागाव्या मागण्यास बाध नाहीं· हें ख
रें तरीं कशा मनाने ह्या गोष्टी मागाव्या हें संभाळि
लें पाहिजे· ह्या गोष्टी मिळाल्याच पाहिजेत ह्या गो
ष्टी मिळाल्या नाहींत तर जिवास सुख वाटायाचें
नाहीं अशा मनाने मागाव्या काय तर नाहीं नाहीं·
अशा मनाने संसाराच्या गोष्टी मागणें पाप आहे· प-
रंतु जें मागितलें तें द्यावें असे जर देवास बरें वाट
लें जें मागितलें तें हितकारक होईल असें जर



देवास दिसलें जें मागितलें तें आत्म्याच्या उद्धारा
स विघ्न करणार नाहीं मोडती घालणार नाहीं अ
सें जर देवास दिसलें तरच देवाने द्यावें नाहीं तर
न द्यावें अशा मनाने संसाराच्या गोष्टी मागाव्या·
जें कांहीं आत्म्याच्या उद्धाराला आड येतें जेणें क-
डून आत्म्याच्या उद्धारास विघ्न पडतें किंवा मोड
ती पडती तें वायीट आहे तें मागूं नये· संपत्ति
दौलत मोठी पदवी लोकांत मोठें नाव विषय सु
ख असल्या गोष्टी बहूत करून आत्म्याच्या उद्धा-
रास आड येतात ह्मणून ह्या गोष्टी मला मिळा-
ल्याच पाहिजेत ह्या गोष्टी मला मिळाल्या नाहींत
तर मला मोठेंच दुख वाटेल अशा मनाने ह्या गो
ष्टी जो मागतो त्याला आत्म्याच्या उद्धारापेक्षां संसा
राचें सुख प्रिय आहे असें स्पष्ट दिसतें माझा उद्धा
र घडला नाहीं तर फार चिंता नाहीं असा त्याच्या
करण्याचा अर्थ आहे·

ह्याच सात गोष्टी मागाव्या दुसरी कोण्ही गो
ष्ट मागूं नये असें येशूचें मन नव्हतें हें वर लिहि
लेल्यावरून तुह्मास समजेल हीच प्रार्थना कस

दुसरी प्रार्थना करूं नये असें त्याचें ह्मणणे नव्हतें परंतु ह्याप्रकारें ह्या रीतीने प्रार्थना करा असें त्याचें ह्मणणें होतें· प्रार्थना करण्याची रीती येशूने शिकवली कशा गोष्टी मागाव्या आणि कशा मनाने मागाव्या ह्यांविषयीं शिष्यांस ज्ञान व्हावें ह्मणून येशूने ही प्रार्थना त्यांस शिकवली·

अहो ह्या प्रार्थनेचा विचार पुनः करा ही प्रार्थना कसी चांगली कसी योग्य आहे· मनुष्यानी करावी ह्मणून कसी योग्य आहे परम पवित्र देवाने ऐकावी ह्मणून कसी योग्य आहे· ह्या प्रार्थनेच्या प्रत्येक वाक्याचा विचार करा थोडा विचार असा नाहीं पुरता विचार करा· मी प्रश्न करितों तुह्मास माझा प्रश्न ऐकून घ्या माझा प्रश्न लाहान नाहीं मोठा आहे तुह्मी देवाची प्रार्थना करीत असतां किं नाहीं हा माझा प्रश्न देवाने जन्मास घातलें देवाने बुद्धि दिल्ही देव नित्य संभाळितो नित्य पोसितो तरीं देवाचें स्मरण करीत नाहींत देवाची प्रार्थना करीत नाहींत देवाचा उपकार मानीत नाहींत असीं लक्षावधि मनुष्यें आहेत तुह्मी तसींच आहा किं काय तुह्मी



तसींच आहा तर तुमची अवस्था फार वायीट आहे देव तो तुमचा उत्पन्न करणारा संभाळणारा पोसणारा राखणारा आहे तरीं तुह्मी त्याला विसरितां हें फार फार वायीट· आमची गोष्ट तसी नव्हे आह्मी देवाची प्रार्थना करीत असतों· असें जर तुह्मी ह्मणाल तर कोणत्या देवाची प्रार्थना करीत असतां हें मी तुह्मास पुसतों सृष्टीचा उत्पन्न करणारा आणि राजा असा जो परम पवित्र परम न्यायी परम कृपाळू यहोवा ह्मणजे स्वयंभू देव ह्याची प्रार्थना करीत असतां किं ज्यांस चालतां येत नाहीं बोलतां येत नाहीं पाहतां येत नाहीं समजतां येत नाहीं असे जे लाकडाचे देव मातीचे देव धातूचे देव ह्यांची प्रार्थना करीत असतां· अशा माणसांच्या हातानी केलेल्या देवांची प्रार्थना करितां तर मोठें पाप करितां· सृष्टीचा उत्पन्न करणारा आणि राजा असा जो परम पवित्र परम न्यायी परम कृपाळू देव त्याला सोडून त्याला विसरून त्याला पाठीमागें टाकून माणसांच्या हातानी केलेल्या देवांची प्रार्थना करणें हें अघोर पाप होय· असें जे करितात त्यांचें

केवढें मूर्खपण हो त्यांचा केवढा आंधार हो· आज
पासून हें मोठें पाप तुह्मी करूं नका हो· आजपासून
पुढें तुमचा जो उत्पन्न करणारा आणि धनी त्याची
च प्रार्थना करीत जा· आणखी मी तुह्मास पुसतों
तुह्मी देवाची प्रार्थना करितां तेव्हां कोणत्या गोष्टीं
विषयीं प्रार्थना करितां काय काय मागतां केवळ
संसाराच्या गोष्टी मागतां द्रव्य कीर्ति विषय सुख
असल्या गोष्टी मात्र मागतां किं काय असें आहेत
र तुमची गोष्ट चांगली नाहीं तुमची प्रार्थना योग्य
नाहीं तुह्मी अझून सैतानाला वश्य आहा तुह्मी
अझून पापाच्या गर्देंत अहा तर अहो माणसानो
काळजी धरा स्वस्थ बसूं नका तुह्मी पापांत स्वस्थ
बसलां तर तुमचा सत्यनाश होईल तुह्मी मरणा
नंतर नरकांत बुडाल आणि सर्वकाळ अवाच्य अ
चिंत्य असें दुःख भोगाल· अहो मित्रानो हें तुह्मास
प्रास न व्हावें ह्मणून एकला जो तारणारा एकला
जो सद्गुरु ह्मणजे येशू ख्रीस्त त्याला शरण या त्या-
च्या पायां पडा त्याजवर भाव ठेवा त्याचे शिष्य व्हा
मग येशू तुमचें कल्याण करील· तो आपला



पवित्र आत्मा देऊन तुमचें अंतःकरण शुद्ध करी
ल पापापासून नरकापासून तुमचें तारण करील
आणि तुह्मास देवाज्ञा झाल्यावर देवापासीं जागा
देईल· ऐकाहो येशू ख्रीस्ताला शरण याल तर
तुमचा उद्धार होईलच परंतु येशू ख्रीस्ताला जर
तुह्मी शरण येत नाहीं तर तुमचा उद्धार व्हाव-
याचाच नाहीं कांकिं उद्धार करणारा तोच एक-
लाच आहे·

येशूला शरण येऊन त्याच्या नांवाने देवा
ची प्रार्थना केली पाहिजे येशूचें नांव घेऊन देवां
चा प्रार्थना केली तरच आपली प्रार्थना देवापा-
सीं सादर होती येशू योग्य परम योग्य आहे दे
वाची परम प्रीति त्याजवर आहे त्याने मनुष्या-
च्या जन्मांत येऊन मनुष्याचा देह धरून मनुष्यां
साठीं प्रायश्चित्त केलें आणि देवाच्या सर्व आज्ञा
मानून मनुष्यांसाठीं पुण्य मिळविलें त्यावरून
तो देवाच्या आणि मनुष्यांच्या मध्यें मध्यस्थ झा
ला· त्याला शरण येऊन त्याच्या नांवाने देवाची
प्रार्थना करितात असे जे त्यांची प्रार्थना देवापासीं

सादर करावी हा त्याचा अधिकार· त्याने आपणजीं कार्यें केलीं त्यांजवरून तो आपल्या शरणांगतांसाठीं आपल्या बापापासीं विनंती करितो· त्यानेजीं कार्यें केलीं तीं देवास फार पसंत आहेत ह्मणून त्या कार्यांवरून ज्याच्यासाठीं येशू विनंती करितो तो पार पडेलच पडेल· आह्मी योग्य आह्मी पुण्यवान् आमच्या पदरीं पाप नाहींच ह्मणून आह्मी ज्या गोष्टी मागतों त्या आह्मास दे असें कोण्हा मनुष्याच्याने देवापासीं ह्मणवत नाहीं आपण सर्व अयोग्य आहों आपण सर्व पापी आहों ह्मणून आपलेंच नाव घेऊन आपल्या योग्यतेवरून आपण प्रार्थना केली तर देवाकडून आपणास कांहीं मिळायाचें नाहीं परंतु येशूला शरण येऊन येशूवर भाव ठेवून येशूच्या नांवाने आपण देवाची प्रार्थना केली तरज्या ज्या कल्याण कारक गोष्टी पाहिजेत त्या त्या मिळतील·

आंब्रोळींत छापिलें

१८३८